## प्रेस नोट दि.१०/०६/२०२२
## निगडी पोलीस ठाणे तपास पथकाची कामगिरी
## व्यवसायतील उदारी न दिल्याने एका व्यवसायीकास जबरदस्तीने पळवुन घेवून जबर मारहाण ०८ तासाच्या आत उघड व पाच आरोपीस अटक

---

दि.१०/०६/२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वा. चे सुमारास नियंत्रण कक्ष येथुन माहिती मिळाली की, त्रिवेणीनगर चौक येथुन एका इसमांस काळ्या रंगाचे कारमध्ये काही लोक मारहाण करुन घेऊन गेले आहेत. अशी माहिती मिळाल्याने लागलीच सदर गुन्ह्याचे घटनास्थळी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड, मा.पोलीस निरीक्षक विश्वजीत खुळे, सपोनि कोरडे, तपासि अंमलदार असे सर्वजण जाऊन माहिती घेतली असता एक कॉलर याची भेट घेऊन त्याचेकडुन घडलेल्या घटनेची माहीती घेतली असता त्यांनी ४ ते ५ मुलांनी एका मुलास मारहाण करुन जबरदस्तीने काळ्या रंगाच्या फोर व्हीलर गाडीमध्ये घालुन खंडोबा माळच्या दिशेने गेले असल्याचे सांगीतल्याने सदरची माहीती मा.अंकुश शिंदे पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व मा.डॉ.संजय शिंदे अप्पर पोलीस आयुक्त सो, .मा.श्री मंचक इप्पर पोलीस उप आयुक्त सो परि-१ पिं.चिं. व मा.डॉ.सागर कवडे सहा.पोलीस आयुक्त सो पिंपरी विभाग यांना दिली. त्यानंतर मा.पोलीस आयुक्त सो व मा.अप्पर पोलीस आयुक्त सो यांचे मार्गदर्शन घेवून तीन टिम निगडी पोलीस ठाणेच्या तयार करण्यात आल्या त्यानंतर घटनास्थळा जवळील आजूबाजूचे सी.सी.टी.व्ही.फुटेज चेक करुन केले असता एक काळपट निळ्या रंगाची एस.क्रॉस कार नं. एम.एच. १२ पी.टी.५२७६ ही दिसत असल्याने सदरची माहीती मा.वपोनि गणेश जवादवाड सो यांनी नियंत्रण कक्ष, पिंपरी चिंचवड व पुणे शहर यांना कळविले व नाकाबंदी लावण्यास सांगीतली. सदरची गाडी ही हडपसरचे दिशेने गेली असल्याचे समजल्याने वाहन अँप वरुन सदर गाडी नंबर टाकून वाहन अँपवर त्याचे डिटेल काढून त्याची माहीती घेवून एक टिम वपोनि गणेश जवादवाड, सपोनि कोरडे, पोना/विनोद व्होनमाने, पोना/विजय बोडके, पोना/तुषार गेंगजे असे खाजगी वाहनाने हडपसर येथे गेले.तांत्रिक विश्लेषणाचे आधारे काम करीत असताना सी.सी.टी.व्ही.फुटेज मधील कार ही हडपसर येथे दिसल्याने त्यांना पकडले. अपहृत इसमांची सुखरुप सुटका करण्यात आली. त्याचेकडे तपास केला असता त्यानी सांगितले की.त्यानंतर मी दोन महिन्यापुर्वी अंदाजे १४ लाखाचा माल विकत घेतला.त्यातील त्यांना ११ लाख रु दिले व ३ लाख रु देणेबाकी आहे.मी पैसे देत नसल्याने त्याने मला कोंबडया देण्यास बंद केले. दि.०९/०६/२०२२ रोजी दुपारी ०१.३० वा.सुमारास मला विकी झांबरे यांने त्याचे मोबाईल क्र.८७ ८८१६१५३२ यावरुन माझे फोन नं.७०२०४१५४७७यावर फोनकरुन वाकड येथील भुमकर चौकात येण्यास सांगितले.त्यानंतर मी तेथे गेलो.तेथे विकी झांबरे व त्याचे चार साथीदार सोबत होते. त्यावेळी त्यांनी मला ३ लाख रु उदारी मागितली. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, मला काही हॉटेलची उदारी बाकी आहे ते दिल्यानंतर तुमचे पैसे देवून टाकतो. त्यावेळी त्यांनी मला कोणते हॉटेल आहेत ते दाखव. त्यावेळी मी माझ्या अँक्टीवा. एम.एच.१४ एच.व्ही ९७३४ मोटार सायकलवर ते त्याचे चारचाकी एस क्रॉस नं. एम.एच १२ पी.टी. ५२७६ या कारमध्ये ते सर्वजण बसले. मी त्यांना के.जी.एन. बिर्याणी हॉटेल, विकासनगर देहुरोड पुणे, कुरेशी चिकन सेन्टर गणेशनगर तळवडे,गाजी दरबार केटर्स टॉवर लाईन येथे गेलो तेथील मालकांनी उदारी दिली नाही.त्यानंतर त्यातील एक इसम माझ्या अँक्टीवा मोटार सायकवर बसला व बाकीचे चारजण कारमध्ये बसले. आम्ही सर्वजण त्रिवेणीनगर चौकातून भक्ती शक्ती चौकाकडे जाणा-या सर्व्हीस रोडने जात असताना,त्यांनी मला सर्व्हीस रोडवर थांबण्यास सांगितले.मला थांबवून त्यांनी तु आमच्या सोबत आमच्या ऑफीसला यायचे तुझ्याकडून कसे पैसे काढयाचे ते आम्ही बघतो असे बोलून विकी झांबरे व त्याचे सोबतच्या चौघांनी मला शिवीगाळ करुन लाथाबुक्यानी मारहाण करुन जबरदस्तीने मला कारमध्ये बसवुन घेवून गेले.अशी हकीकत सांगितली.

अपहरण व्यक्तीस व सदर आरोपी यांना ताब्यात घेतले व निगडी पोलीस ठाणे येथे घेवून आले त्यावेळी पोलीसांनी त्याचे नाव विचारले असता त्यांची नावे १) विकी बाळासाहेब झांबरे वय - २८ वर्षे २) उदय रंघनाथ तिराळे वय - २५ वर्षे ३) सोमनाथ भैरु काळभोर वय - ३० वर्षे ४) रवी वसंत ठाकुर वय - १९ वर्षे सर्व रा. झांबरेवस्ती कोळकरवाडी उरुळदेवाची हडपसर पुणे ५) पवन विलास महाजन वय - ३० वर्षे रा. गायकरवाडी वडकी हडपसर पुणे असे असल्याचे सांगितले आहे. अपहरण करते राकेशसिंग राजेंद्रसिंग ठाकुर वय ३३ वर्षे धंदा - व्यवसाय रा. ज्ञानेश्वर

काळभोर चाळ दुर्गानगरचौकचिंचवड पुणे  याचा तक्रार घेवून दि. १०/०६/२०२२ रोजी निगडी पोलीस ठाणे गु.र.न. ४३९/२०२२ भा.द.वि.क. ३६५,३४२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून सदर आरोपीतांना रात्रौ ०३.३० वा. अटक करण्यात आली आहे. एकंदरी सदरच फिर्यादीचे अपहरण करण्यात आले होते. त्यावेळी कोणाचे अपहरण केले कोणी केले, व गाडी कोणती होती याबाबत काहीएक माहीती नव्हती फक्त एका सुज्ञ नागरीक स्त्री ने रोडवर एका व्यक्तीस मारहाण करून जबरदस्तीने फोरव्हीलर गाडीमध्ये टाकून घेवून जाताना पाहून १०० नंबरवर फोन करून तोटक माहीती दिल्याने निगडी पोलीसांनी चिकाटीने सदर घटनेचा छडा लावुन सदरचे प्रकरण उघडकीस आणून सर्व आरोपींना ८ तासाचे आत बेडया ठोकल्या. सदर कॉलर महिलेचा मा.श्री. अंकुश शिंदे सो., पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांचे हस्ते यथोचीत सत्कार करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील पाचही आरोपींना अटक करण्यात आली असुन त्याची पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली असुन पुढील तपास स.पो.नि. अमोल कोरडे हे करत आहेत.

सदरची कामगिरी मा.श्री.अंकुश शिंदे पोलीस आयुक्त सो, मा.डॉ.संजय शिंदे अप्पर पोलीस आयुक्त सो, मा.श्री.मंचक इप्पर पोलीस उपआयुक्त सो परि - १, मा.श्री.काकासाहेब डोळे पोलीस उप आयुक्त सो, मा.डॉ.सागर कवडे सहायक पोलीस आयुक्त सो पिंपरी विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली श्री.गणेश जवादवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक ,श्री.विश्वजीत खुळे पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री. अमोल कोरडे, सहा.पोलीस निरीक्षक, निगडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील पोलीस हवालदार सुधाकर अवताडे, सतिश ढोले, दत्ता शिंदे, राजेंद्र जाधव ,पोलीस नाईक शंकर बांगर, विनोद व्होनमाने,सोमनाथ दिवटे, विजय बोडके, विलास केकाण,भुपेंद्र चौधरी, तुषार गेंगजे,राहुल मिसाळ,रुपेश गेंगजे यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालय यांनी केली आहे.

**(मंचक इप्पर)**
**पोलीस उप-आयुक्त**
**परि-१ पिंपरी चिंचवड आयुक्तालय**